दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/समावेशन/२०२०/ 2829    दिनांक : 20 SEP 2020

परिपत्रक :

**विषय : शासकीय कर्मचा-याच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत एका नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवरुन दुस-या नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण.**

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.५०९/कार्या.१२, दिनांक १५ मे, २०१९.
(२) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक तंशिविकापु/आस्था-३(ब)/समावेशन/२०१९/३२५९, दिनांक ०६/०८/२०१९.
(३) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक तंशिविकापु/आस्था-३(ब)/बदल्या/२०२०/१७६५, दिनांक ११/०६/२०२०.

विनंतीवरुन / संवर्गबाह्य बदलीबाबतचे धोरण निश्चित केल्याबाबतचा दिनांक ०३ जून, २०११ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आला असून शासकीय कर्मचा-याच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत एका नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवरुन दुस-या नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण संदर्भ क्रमांक (१) च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या https://www.maharashtra.gov.in/1145/Government-Resolutions या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा २०१९०५१५१२२७२८२४०७ असा आहे.

निम्नस्वाक्षरीकारांच्या असे निदर्शनास आले आहे की, या कार्यालयाने वारंवार सूचित करुनही ब-याच संस्थातील कर्मचा-यांचे विभागीय बदलीचे प्रस्ताव संस्था स्तरावर पडताळणी न करता, संबंधित विषयातील शासन निर्णय / परिपत्रके इत्यादींमधील तरतूदी विचारात न घेता अपूरे. आवश्यक ती कागदपत्रे / दाखले न जोडता चुकीचे प्रस्ताव या कार्यालयास सादर केले जातात. असे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्याची पडताळणी करुन त्यावर योग्य ते निर्णय घेण्यास या कार्यालयाचा नाहक वेळ वाया जातो व प्रसंगी संबंधित कर्मचा-याचे नुकसान होण्याचा संभव असतो.

त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.५०९/कार्या.१२, दिनांक १५ मे, २०१९ मधील मुद्दा क्रमांक २, ३ व ९ नुसार शासकीय कर्मचा-यास ज्या ठिकाणी समावेशनाने कायम स्वरुपी जाण्याची इच्छा आहे, त्याने त्या ठिकाणी असणा-या शासकीय कार्यालयाकडून सरळसेवेच्या / पदोन्नतीच्या रिक्त पदांची प्रवर्ग निहाय माहिती प्राप्त करुन त्यानंतर त्याच्या नियुक्ती प्राधिका-याकडे कोणत्या अपवादात्मक वैयक्तिक कारणास्तव कायम स्वरुपी समावेशन करणे आवश्यक आहे, त्याबाबतच्या पुराव्यासह विनंती अर्ज करणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे.

सबब सदर शासन निर्णय संबंधित संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेऊन तो संस्थेतील / कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून, ज्या कर्मचाऱ्यांना बदलीसाठी अर्ज करावयाचा आहे, अशा कर्मचा-यांचे अर्ज सदर शासन निर्णयातील तरतूदी व सूचना विचारात घेऊन संस्था स्तरावरच अर्जाची पडताळणी करुन अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह व आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह या कार्यालयास सादर करावेत. तसेच संस्थेतील / कार्यालयातील आस्थापना विभागाने शासनाचे संकेतस्थळ रोजच्या रोज पाहून शासनाच्या संकेतस्थळावरुन शासन निर्णय उपलब्ध करुन घेऊन संस्थेतील / कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावेत.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था प्रमुखांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता रवाना.
(२) ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

E:\my documents\Samaveshan 15-05-2019.docx\86